संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयाच्या संगणीकरण व ई-प्रोसिक्यूशन प्रकल्पासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : डीपीपी-१०१८/प्र.क्र.३५७/पोल-१०,
मंत्रालय, २ रा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०९ सप्टेंबर, २०१९

वाचा:- १) गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र. क्र.६४/विशा-३, दि.०२.०६.२०१६, दि.२२.०३.२०१७ व दि.२०.०७.२०१७
२) अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीच्या दि.२५.०२.२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
३) संचालक, अभियोग संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. ई-प्रोस्युकेशन/ ४२३/२०१९, दि.०१.०३.२०१९ व दि.२०.०६.२०१९

प्रस्तावना :-

राज्यात ई-प्रोसिक्यूशन प्रकल्प राबविण्याकरीता प्रकल्प अहवाल सादर करण्याबाबत प्रकल्प सल्लागार मे.पीडब्ल्यूसी कंपनीस निर्देश देण्यात आले होते. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.५.१०.२००१ अन्वये राज्यात माहिती तंत्रज्ञान विषयक धोरण तसेच संगणकीकरणाचा कृती कार्यक्रम राबविण्यासाठी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. तथापि गृह विभाग, शासन निर्णय दि.२२.०३.२०१७ नुसार गृह विभागातील सर्व तंत्रज्ञान विषयक प्रकल्पांचा समावेश गृह विभाग, शासन निर्णय दि.०२.०६.२०१६ अन्वये अपर मुख्य सचिव गृह यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या कार्यकक्षेत करण्यात आला आहे.

गृह विभाग, शासन निर्णय दि.०२.०६.२०१६, दि.२२.०३.२०१७ व दि.२०.०७.२०१७ अन्वये गृह विभागाच्या विविध तंत्रज्ञान विकास प्रकल्पासाठी उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समिती अ.मु.स.(गृह) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यात ई- प्रोसिक्यूशन प्रकल्प राबविण्याकरीता नेमण्यात आलेल्या प्रकल्प सल्लागार मे.पीडब्ल्यूसी कंपनीने सादर केलेल्या प्रकल्पाच्या अहवालास (Detail Project Report) व या प्रकल्पासाठी येणा-या रु. २११९.३७ लाख

इतक्या (भांडवली खर्च रु. ७५९.०७ लाख व कार्यान्वयन खर्च रु.१३६०.३० लाख) खर्चास अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२५.०२.२०१९ रोजी झालेल्या उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली. सदर प्रकल्पासाठी येणा-या रु. २११९.३७ लाख इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u> :

राज्यात ई-प्रोसिक्यूशन प्रकल्प राबविण्याच्या अनुषंगाने संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिनस्त कार्यालयांमध्ये संगणकीकरण करणे व तद्अनुषंगिक आवश्यक ती साधनसामुग्री इत्यादी उपलब्ध करुन देण्याकरीता उच्चस्तरीय समितीने मान्य केलेल्या विस्तृत प्रकल्प अहवालानुसार (DPR) व त्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार, बाब निहाय होणाऱ्या रु.२१,१९,३७,०००/- (रुपये एकवीस कोटी एकोणीस लाख सदत्तीस हजार फक्त) एवढ्या खर्चास शासन प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. यातील Hardware and office infrastructure या अंतर्गत वस्तू/सेवांची खरेदी, GeM पोर्टलवरून विहित पद्धतीनुसार करण्यात यावी.

३. सदर प्रकल्प पुढील पाच वर्षात राबवावयाचा असून यासाठी होणारा खर्च “मागणी क्र.१, २०५५- पोलीस (००) ११५, पोलीस दलाचे आधुनिकीकरण (०१) विविध तंत्रज्ञान विकास प्रकल्प (०१) (०१) तंत्रज्ञान विकास प्रकल्प (२०५५ ए०३२)” या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. व तो त्या-त्या वर्षीच्या मंजूर / उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

४. *सदरचा शासन निर्णय शासनाच्या मान्यतेने व उपरोक्त उच्चस्तरीय समितीच्या दि.२५.२.२०१९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयांच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.*

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०९०९१४०८५१३०२९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Kishor Shyamrao Bhalerao

Digitally signed by Kishor Shyamrao Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ce6f6edd7e1dfc6b4d6b65b7d93aa1a1dbcf0ec79c7c2143850ff6e8fdcb4c0d, serialNumber=94524ab889e2fa9e6bfe5e1e58426881bc36b968ffd0f45ce2d4bd3ff527ded2, cn=Kishor Shyamrao Bhalerao
Date: 2019.09.09 15:36:49 +05'30'

(किशोर भालेराव)
उप सचिव (विधि), महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा. राज्यमंत्री, गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव
५. मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव
६. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
७. अपर मुख्य सचिव (अपील व सुरक्षा) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
८. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
९. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०.संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
१२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१४.प्रकल्प संचालक, मे.पीडब्ल्यूसी, मुंबई.
१५.वित्त विभाग, व्यय-७/ वित्तीय सुधारणा.
१६.अवर सचिव, अर्थ-१, गृह विभाग.
१७.निवडनस्ती, पोल-१०.

शासन निर्णय क्रमांक : डीपीपी-१०१८/प्र.क्र.३५७/पोल-१०, दिनांक : ०९ सप्टेंबर, २०१९ सोबतचे विवरणपत्र

Components	*Capital Expenditure (In Lakh)*	*Operation Expenditure (In Lakh)*
Hardware	६००.३६	३१२.९१
Network Connectivity	१८.९७	१८५.४
Office Infrastructure	६.४५	०. ००
Services/Manpower	५. ००	४१.४२
Software	३७.७५	४७२.७४
Training & Capacity Building	५४.४	२८३.०६
Total (in Lakh)	**७२२.९२**	**१२९५.५३**
Contingency (५%)	**३६.१५**	**६४.७८**
Final Total	**७५९.०७**	**१३६०.३**
Overall Total (Capital + Operation Expenditure)		**२११९.३७**

(Rs. Twenty One Crore Nineteen Lakh Thirty Seven Thousand Only)

Kishor Shyamrao Bhalerao

Digitally signed by Kishor Shyamrao Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ce6f6edd7e1dfc6b4d6b65b7d93aa1a1dbcf0ec79c7c2143850ff6e8fdcb4c0d, serialNumber=94524ab889e2fa9e6bfe5e1e58426881bc36b968ffd0f45ce2d4bd3ff527ded2, cn=Kishor Shyamrao Bhalerao
Date: 2019.09.09 15:37:29 +05'30'

(किशोर भालेराव)
उप सचिव (विधि), महाराष्ट्र शासन